# पुणे विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांमधे राबविला जाणारा प्रयोगजीवी कला अभ्यासक्रम (बी.पी.ए.)

२०१२–२०१३

## बी.पी.ए. प्रथम वर्ष – संगीत

## बी.पी.ए. प्रथम वर्ष (संगीत)

### सर्वसाधारण निर्देश :-

- विद्यार्थ्यांना एकावेळी संगीत, नृत्य, नाट्य यांपैकी एकाच विषयाचा अभ्यासक्रम शिकता येईल.
- एक प्रात्यक्षिक तासिका ही एका सैध्दांतिक तासिकेइतकी मोजली जावी.
- प्रत्येक अभ्यासक्रम शिकवताना दर आठवड्याला सैध्दांतिक अभ्यासक्रमासाटी विद्यापीठाने ठरवलेल्या कालावधीची एक तासिका २५–३० विद्यार्थ्यांच्या तुकडीसाठी असेल.
- संगीत – सामान्य अभ्यासक्रम शिकवताना दर आठवड्याला प्रात्यक्षिक अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने ठरविलेल्या कालावधीच्या ३ तासिका १०–१२ विद्यार्थ्यांच्या तुकडीसाठी असतील.

### उपस्थितीविषयक निर्देश :-

- हे सर्व अभ्यासक्रम नियमित विद्यार्थ्यांसाठी आहेत. बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी नाहीत.
- बी.पी.ए. संगीत विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी विषयाच्या स्वरुपानुसार महाविद्यालयातील संबंधित तासिकांना किमान ८०% उपस्थिती असणे अनिवार्य आहे.

### गुणविभाजन विषय निर्देश :-

- बी.पी.ए. प्रथम वर्ष– (संगीत) करिता एकूण ८०० गुणांचा अभ्यासक्रम असेल.
- ८०० गुणांची होणारी परीक्षा खालील विषयांची असेल.

## बी.पी.ए. प्रथम वर्ष (संगीत)

### सर्वसाधारण निर्देश :–

- विद्यार्थ्यांना एकावेळी संगीत, नृत्य, नाट्य यांपैकी एकाच विषयाचा अभ्यासक्रम शिकता येईल.
- एक प्रात्यक्षिक तासिका ही एका सेध्दांतिक तासिकेइतकी मोजली जावी.
- प्रत्येक अभ्यासक्रम शिकवताना दर आठवड्याला सेध्दांतिक अभ्यासक्रमासाटी विद्यापीठाने ठरवलेल्या कालावधीची एक तासिका २५–३० विद्यार्थ्यांच्या तुकडीसाठी असेल.
- संगीत – सामान्य अभ्यासक्रम शिकवताना दर आठवड्याला प्रात्यक्षिक अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने ठरविलेल्या कालावधीच्या ३ तासिका १०–१२ विद्यार्थ्यांच्या तुकडीसाठी असतील.

### उपस्थितीविषयक निर्देश :–

- हे सर्व अभ्यासक्रम नियमित विद्यार्थ्यांसाठी आहेत. बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी नाहीत.
- बी.पी.ए. संगीत विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी विषयाच्या स्वरुपानुसार महाविद्यालयातील संबंधित तासिकांना किमान ८०% उपस्थिती असणे अनिवार्य आहे.

### गुणविभाजन विषय निर्देश :–

- बी.पी.ए. प्रथम वर्ष– (संगीत) करिता एकूण ८०० गुणांचा अभ्यासक्रम असेल.
- ८०० गुणांची होणारी परीक्षा खालील विषयांची असेल.

3

| | एकूण | सत्र १ | | सत्र २ | |
|---|---|---|---|---|---|
| | | अंतर्गत | परीक्षा | अंतर्गत | परीक्षा |
| भाषा इंग्रजी (अनिवार्य) | १०० | १० | ४० | १० | ४० |
| भाषा मराठी (अनिवार्य) | १०० | १० | ४० | १० | ४० |
| सैध्दांतिक १ (शाखानिहाय) (संगीत) | १०० | १० | ४० | १० | ४० |
| सैध्दांतिक २ (शाखानिहाय) (संगीत) | १०० | १० | ४० | १० | ४० |
| प्रात्यक्षिक परीक्षा + मौखिक | २०० | – | १०० | – | १०० |
| वार्षिक मंचप्रदर्शन | २०० | – | – | – | २०० |
| – | ८०० | | | | |

–

- अंतर्गत मुल्यांकनाव्यतिरिक्त प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ४०% गुण मिळविणे आवश्यक आहे. उदा. इंग्रजी विषयात सत्र १ मधे ४० पैकी १६ गुण मिळवणे आवश्यक आहे.

महाविद्यालयासाठी आवश्यकता :-

- संगीत, नृत्य, नाट्य या कला प्रयोगजीवी कला असल्याने यासाठी इतर विभागांपासून दूर जागा असावी.
- सदर विषयांसाठी स्वतंत्र खोल्या असाव्यात.
- विद्यार्थ्यांच्या रियाजासाठी स्वतंत्र खोल्या असाव्यात.
- स्वतंत्र ग्रंथालय असावे व त्यात सैध्दांतिक व प्रात्यक्षिकांसाठीची कमीत कमी २०० पुस्तके असावीत.
- ग्रंथालयात सी.डी. व व्ही.सी.डी. असाव्यात.
- विद्यार्थ्यांना संगीत ऐकण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी.
- या प्रयोगजीवी कलांसाठी स्वतंत्र प्रेक्षागृह असावे.
- नृत्य व नाव्यासाठी आवश्यक ती प्रकाशयोजना असावी.
- या तीनही कलांसाठी ध्वनीवर्धकांची व्यवस्था करण्यात यावी.
- मेकअप रुम, मेकअप साहित्य(रंगभूषा) व वेशभूषा सज्जा असावी.
- संगीतासाठी स्त्री व पुरुष गायक व वादकांसाठी वाद्यांचे त्या-त्या आवाज गुणधर्मानुसार तानपुरे, इलेक्ट्रॉनिक तानपुरे व तबले, हार्मोनियम व लेहरा मशिन यांची व्यवस्था करावी.
- रियाजासाठी साउंड प्रूफ रुम असावी.

**पेपर १: भाषा : इंग्रजी (अनिवार्य)**

अभ्यासक्रमाचा आराखडा :

बी.पी.ए. प्रथम वर्ष अनिवार्य इंग्रजी

(सामान्य १) (compulsory English G1) हा उपलब्ध अभ्यासक्रम वेळोवेळी होणाऱ्या बदलांसह व मार्गदर्शक तत्वांसह राबवला जावा.

**पेपर २ :– भाषा : मराठी (अनिवार्य)**

अभ्यासक्रमाचा आराखडा :

वरीलप्रमाणे

## बी.पी.ए.(संगीत)

## प्रथम वर्ष

**पेपर १ भाषा : इंग्रजी**

**पेपर २ भाषा : मराठी**

**पेपर ३ : संगीतविषयक व्याख्या आणि संकल्पना**

**सत्र १**

- संगीताची ओळख
  - स्वरज्ञान, शुध्द–कोमल–तीव्र स्वर
  - व्याख्या– पूर्वांग, उत्तरांग, स्वर, सप्तक, आधारस्वर.
- तालज्ञान
  - तीनताल, एकताल
  - ठेका
  -ताललेखन
- नादाचे गुणधर्म
  - नाद
  - रागाच्या

**सत्र २**

- रागांची ओळख
  - भूप, भैरव, यमन, या रागांची शास्त्रीय माहिती व आरोह, अवरोह, पकड यांसह् आलाप तानांचे लेखन
  - वरील रागांमधील मध्यलयींमधील बंदिशींचे स्वरलेखन

## पेपर ४ : 'संगीतशास्त्र'

### सत्र १

- थाट व राग संकल्पना
- संगीत प्रकार : लोकसंगीत, भावसंगीत, शव्दप्रधान गायकी यांची तोंडओळख
- भातखंडे व पलुस्कर स्वरलेखन पध्दती.

### सत्र २

- श्रुती, श्रुतींची नावे
- वादी, संवादी, विवादी, अनुवादी स्वर, वर्ज्य स्वर, कण स्वर, मंद्र–मध्य–तार सप्तक
- अल्हैय्य बिलावल, वृंदावनी सारंग आणि देस
- ताल: केहरवा, दादरा, रुपक, झपताल

## पेपर ५ : प्रात्यक्षिक परीक्षा आणि मौखिक परीक्षा

### सत्र १

- भैरव, भूप आणि यमन या ३ रागांमधील मध्यलय बंदिश आलाप तानांसह
- लक्षण गीत, सरगम गीत
- तीनताल व एकताल हातांवर टाळी देवून म्हणणे.
- राष्ट्रगीत आणि भक्तीगीत
- सरगमवरुन राग ओळखा.

सत्र २

- राग अल्हैय्या बिलावल, वृंदावनी सारंग या रागातील मध्यलय बंदिश आलाप तानांसह.
- प्रथम व द्वितीय सत्रातील कोणत्याही एका रागातील ख्याल.
- प्रथम व द्वितीय सत्रातील कोणत्याही एका रागातील धृपद.
- दादरा, केहरवा, झपताल, रुपक हातावर टाळी देवून म्हणणे.
- भावगीत किंवा नाट्यसंगीत

पेपर ६ : मंचप्रदर्शन

- प्रथम, द्वितीय सत्रातील कोणत्याही एका रागातील विलंबित ख्याल आणि त्याच रागातील द्रुत बंदिश एकूण २० मिनिटे म्हणणे.
- एक उपशास्त्रीय किंवा सुगम प्रकार.

संदर्भग्रंथ :-


- भारतीय प्रयोगकला : परिचय आणि इतिहास(संगीत) – अजित सोमण, डॉ. विकास कशाळकर, डॉ. शुभांगी बहुलीकर.
- भारतीय प्रयोगकला : शास्त्रविचार(संगीत) – डॉ. शुभांगी बहुलीकर.
- संगीत रत्नाकर : भाषांतर – डॉ. ग.ह.तारळेकर.
- संगीतशास्त्र – राजोपाध्ये.
- संगीत विशारद – हाथरस प्रकाशन.
- बालसंगीतशिक्षा (भाग १,२ व ३)– विश्वंभरनाथ भट्ट.
- संगीत अभ्यास अंक – लक्ष्मीनारायण गर्ग.
- हिंदुस्थानी संगीत पध्दती:क्रमिक पुस्तक मालिका – विष्णू नारायण भातखंडे.
- संगीतशास्त्र – जगदीश सहाय कुलश्रेष्ठ.
- भारतीय वाद्यांचा इतिहास – डॉ.ग.ह.तारळेकर.
- संगीत परिभाषा – श्री. ना. रातांजनकर.
- रसविचार – र. पं. कंगले.
- उत्तर भारतीय संगीत का संक्षिप्त इतिहास – विष्णू नारायण भातखंडे (अरुण कुमार सेन)
- संगीत कलाविहार – अ.भा.गांधर्व महामंडळ प्रकाशन.
- थोर संगीतकार – डॉ.बा.र.देवधर.

## बी.पी.ए. संगीत (तबला)

### प्रथम वर्ष

**पेपर १ भाषा : इंग्रजी**

**पेपर २ भाषा : मराठी**

**पेपर ३ :**

**सत्र १**

- तबला–डग्गा यांच्या विविध भागांची माहिती
  - सचित्र वर्णन
  - विविध आकाराच्या तबल्यांची माहिती
- तबला–डग्ग्यावर वाजणाऱ्या सर्व प्रमुख वर्णांची माहिती व त्यांची निकासपध्दती लिहीणे
- तबल्याचा संक्षिप्त इतिहास
  - तबल्याचे स्थान
  - उगम आणि विकास व वर्तमानापर्यंतचा प्रवास
- संकल्पना व व्याख्या
  - लय, ताल, सम, मात्रा, विभाग, टाळी, खाली, आवर्तन,संगीत, नाद, स्वर इ.
- सांगितिक योगदान व जीवनचरित्र
  - १. उ. हबिबुद्दिन खाँ, २. उ. मुनीर खाँ, ३. पं. सामताप्रसाद

**सत्र २**

- विविध चर्मवाद्यांची ओळख व माहिती.
  - पखावज, ढोलक, ढोलकी, मृदंगम्, डमरु इ. भारतीय चर्मवाद्ये.
  - जेंबे, बोंगो–कोंगो,ड्रम्स् इ. पाश्चात्य चर्मवाद्ये.

- तबल्याच्या विविध घराण्यांची ओळख तसेच दिल्ली घराण्याची संक्षिप्त माहिती व प्रसिध्द कलाकार
- तबलावादकाचे गुण–दोष
  - एक स्वतंत्र वादक म्हणून
  - एक साथसंगतकार म्हणून
- गायनशैलींची संक्षिप्त माहिती
  - ख्याल, ठुमरी, दादरा, तराणा, टप्पा, चतरंग, त्रिवट, भजन, गझल इ.
- सांगितिक योगदान व जीवनचरित्र
  - १. उ. अहमदजान थिरकवाँ, २. उ.अमिर हुसेन खाँ, ३. उ. अल्लारखा

**पेपर ४ :**

**सत्र १**

- व्याख्या आणि परिभाषा
  - ठेका, दुगुन, तिगुन, चौगुन, किस्म
- लेखनपध्दती
  - पं. भातखंडे व पं. पलुस्कर तालपध्दतीची माहिती.
  - त्रिताल, झपताल, रुपक, दादरा, केरवा इ. ताल लिपिबध्द करणे.
- बंद बाज व खुला बाज यांची सविस्तर माहिती.
- लय संकल्पना
  - लयीची व्याख्या व संकल्पनेचा सविस्तर अभ्यास
- पं. भातखंडे व पं. पलुस्कर तालपध्दतीमध्ये त्रिताल, झपताल, रुपक, दादरा, केरवा इ. ताल दुगुन, तिगुन, चौगुन मध्ये लिपिबध्द करणे.

सत्र २

- व्याख्या आणि परिभाषा
  - कायदा, रेला, मुखडा, तुकडा, तिहाई, इ. च्या व्याख्या.

- पं. भातखंडे पध्दतीनुसार खालील लिपिबध्द करणे
  - त्रिताल– ४ तुकडे व ४ मुखडे.
  - त्रिताल, झपताल, रुपक इ. तालांत सम से सम तक २ तिहाई.
  - त्रिताल– १ कायदा 'तिट' व १ कायदा 'तिरकिट' अक्षरयुक्त व त्याचे ४–४ पलटे व तिहाई.
- निकासपध्दती लिहिणे
  - तिट, तिरकिट, क्डधा, किटतक, तक्डाँ, गदिगन, त्रक, घिडनग इ.
- पं. भातखंडे पध्दतीत खालील तालांचे ४–४ किस्मे लिहिणे.
  - त्रिताल, झपताल, रुपक, दादरा, केरवा

**पेपर ५ : प्रात्यक्षिक आणि मौखिक परिक्षा**

सत्र १

- तबल्याच्या विविध भागांचे ज्ञान व त्यावर वाजणारी प्राथमिक अक्षरे
- खालील तालांची माहिती, हातावर एकपट–दुप्पट, ठेका एकपट–दुप्पट, व ४–४ किस्मे
  - तीनताल, झपताल, दादरा.
- त्रिताल–
  - कायदे– 'तिट' व 'तिरकिट' अक्षरयुक्त, ६ पलटे व तिहाई.
  - तुकडे– २ तुकडे हातावर म्हणून वाजविणे.
  - मुखडे– २ तुकडे हातावर म्हणून वाजविणे.

- रुपक व झपताल मधे सम से सम तक २ तिहाई.
- हाताने टाळी देऊन अभासक्रमातील सर्व बोलसमूह म्हणणे.
- विलंबित, मध्य व दृत लय हातावर टाळी देऊन दर्शविणे. वरील तालांची एकपट-दुप्पट व चौपट म्हणणे.

सत्र २

- तबल्यावर वाजविली जाणारी सर्व प्रमुख अक्षरे व त्यांचा रियाझ.
- खालील तालांची माहिती, हातावर एकपट-दुप्पट, ठेका एकपट-दुप्पट, व ४-४ किस्मे
  - रुपक, एकताल, केरवा.
- त्रिताल
  - कायदा- 'धाती' अक्षरयुक्त, ६ पलटे व तिहाई.
  - रेला- 'तिरकिटतक' अक्षरयुक्त, ६ पलटे व तिहाई.
  - तुकडे- २ तुकडे हातावर म्हणून वाजविणे.
  - मुखडे- २ तुकडे हातावर म्हणून वाजविणे.
- झपताल
  - कायदा- 'तिट' अक्षरयुक्त, ६ पलटे व तिहाई.
- रुपक व झपताल मध्ये प्रत्येकी २ तुकडे हातावर म्हणून वाजविणे.
- हाताने टाळी देऊन अभासक्रमातील सर्व बोलसमूह म्हणणे.
- विलंबित, मध्य व दृत लय हातावर टाळी देऊन दर्शविणे. वरील तालांची एकपट-दुप्पट व चौपट म्हणणे.

पेपर ६ : मंचप्रदर्शन

- तीनताल मधे दोन कायदे, एक रेला तसेच किमान् ४ तुकड्यांसहित १५ मिनिटे स्वतंत्र वादन
- झपताल मधे एक कायदा तसेच किमान २ तुकड्यांसहित ५ मिनिटे स्वतंत्र वादन.
- मंचप्रदर्शनासाठी २० मिनिटे वेळ असेल.

संदर्भग्रंथ :-


- तबलावादन कला और शास्त्र – सुधीर माईणकर.
- तबला – अरविंद मुळगांवकर.
- सर्वांगीण तबला – आमोद दंडगे.
- तालप्रकाश – भगवतशरण शर्मा.
- तालमार्तण्ड – सत्यनारायण वसिष्ठ.
- लयताल विचार – शरश्चंद्र विष्णू गोखले.
- तालकोष – गिरिश्चंद्र श्रीवास्तव


---***---

शुभांगी बहुळीकर